**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक २५नोव्हेंबर २०२२**

**ठळक बातम्या**

1. केंद्र सरकारन राज्य तसच केंद्रशासित प्रदेशांना वस्तू आणि सेवा करातील नुकसान भरपाईपोटी 17 हजार कोटी रुपये केले वितरित; महाराष्ट्राला मिळाले सर्वाधिक 2 हजार 81 कोटी रुपये.
2. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावान पश्चिम नागपुरातील दाभा येथीलकृषी विद्यापीठाच्या मैदानात आंतरराष्ट्रीय दर्जाच कृषी संमेलन केंद्र स्थापन होणार- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा.
3. दिव्यांग सक्षमीकरणात महाराष्ट्राला 7 राष्ट्रीय पुरस्कार जाहीर, अकोला जिल्हा परिषदेचा पुरस्कार प्राप्त संस्थेत समावेश.

आणि

4. महानिर्मितीतर्फे सहाय्यक अभियंता" आणि "कनिष्ठ अभियंता" या पदभरतीकरिता अर्ज करणाऱ्या सर्व उमेदवारांना महाराष्ट्र राज्याच अधिवास प्रमाणपत्र बंधनकारक.

******

**नुकसानभरपाई**

केंद्र सरकारने एप्रिल ते जून 2022 या कालावधीतील जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा करातील उर्वरित नुकसानभरपाई म्हणून 24 नोव्हेंबर 2022 रोजी राज्यांना 17 हजार कोटी रुपये वितरित केले आहेत. यापैकी महाराष्ट्राला सर्वाधिक 2,081 कोटी रुपये मिळाले . 2021-22 या आर्थिक वर्षात जीएसटी भरपाई म्हणून आतापर्यंत राज्य तसच केंद्रशासित प्रदेशांना या रकमेसह एकूण 1 लाख 15 हजार 662 कोटी रुपये देण्यात आले आहेत. फेब्रुवारी ते मार्च 2022 या काळासाठीची तात्पुरत्या स्वरूपातील जीएसटी भरपाई म्हणून केंद्र सरकारन या वर्षी मे महिन्यात देखील 86 हजार ,912 कोटी रुपये वितरीत केले होते.

## प्रभागनिहाय मतदार याद्या

विधानसभा मतदारसंघाच्या मतदार याद्यांतील अपूर्ण आणि चुकीचे पत्ते आणि त्यात नोंदविलेल्या मतदारांच्या नावांमुळे महानगरपालिकांच्या प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यकतेनुसार इमारत, वस्ती, कॉलनी राहिवास क्षेत्राप्रमाणे पत्त्यामध्ये दुरूस्ती करण्याकरिता तातडीन मोहीम राबवावी, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान आणि मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव श्रीकांत देशपांडे यांनी काल संबंधितांना दिले.भारत निवडणूक आयोगातर्फे सध्या विधानसभा मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यांतर्गत 8 डिसेंबर 2022 पर्यंत दावे आणि हरकती स्वीकारण्यात येणार आहेत. त्यामुळे याच कालावधीत ही मोहीम राबवावी. एखाद्या मतदाराचा संपूर्ण पत्ता असूनही तो चुकीच्या सेक्शन ॲड्रेसमध्ये जोडण्यात आला असल्यास तो दुरूस्त करावा, अस आयुक्त मदान यांनी सांगितल आहे.

## यशवंतराव चव्हाण स्मृतिदिन

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा आज ३९वा स्मृतिदिन आहे. त्यानिमित्त त्यांना देशभरात अभिवादन केलं जात आहे. राज्यातही विविध उपक्रमाद्वारे त्यांना आदरांजली वाहण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कराड इथल्या प्रीतिसंगमावर असलेल्या त्यांच्या स्मृतिस्थळावर पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली. यशवंतराव चव्हाण यांची नाळ कष्टकरी, शेतकऱ्यांशी जुळलेली होती, पदाच्या माध्यमातून त्यांनी त्यांचे प्रश्न सोडवले आणि सर्वच क्षेत्राचा विकास हे त्यांच ध्येय होत, यासाठीचे निर्णय त्यांनी घेतले, असं वक्तव्य मुख्यमंत्र्यांनी कराड इथं केलं. यशवंतराव चव्हाण कृषी-औद्योगिक, आणि पशु-पक्षी प्रदर्शनाचं त्यांच्या हस्ते उदघाटन झालं. त्यानंतर आयोजित सभेत ते बोलत होते. यशवंतराव चव्हाण यांनी शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, सहकार, सिंचन, आरोग्य अशा अनेक क्षेत्रात महाराष्ट्राच्या विकासाचा भक्कम पाया रचला, अशा शब्दांत विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी चव्हाण यांना अभिवादन केलं आहे.

## सर्वपक्षीय बैठक

संसदेच्या आगामी हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारनं येत्या ६ डिसेंबरला सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या अधिवेशनात संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं, यासाठी सर्व राजकीय पक्षांचं सहकार्य मिळवण्याकरता ही बैठक आयोजित केली आहे. या अधिवेशनात विधायक चर्चा होतील, अशी अपेक्षा केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी व्यक्त केली आहे.हिवाळी अधिवेशन येत्या ७ डिसेंबरला सुरु होणार आहे. हे २९ डिसेंबरपर्यंत चालेल.

## ऍग्रोव्हिजन कृषी प्रदर्शन

देशाचे पहिले कृषीमंत्री स्वर्गीय डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने पश्चिम नागपुरातील दाभा येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मैदानात एक आंतरराष्ट्रीय दर्जाच अग्रीकल्चर कन्वेशन सेंटर- कृषीसंमेलन केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. यासाठी 150 कोटी रुपयाचा प्रस्ताव केंद्रीय कृषी मंत्रालयाकडे पाठवण्यात आलाआहे . यासंदर्भात आवश्यक ते सहकार्य करण्याच आश्वासन केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्र तोमर यांनी  दिल आहे, अशी माहिती, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी  दिली. विदर्भातील शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाची, जोड धंद्याची माहिती व्हावी त्याचा उपयोग त्यांच्या उत्पन्न वाढीसाठी व्हावा आणि त्यांची शेती लाभदायक व्हावी या हेतून, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकलपनेतून साकारलेल्या  १३ व्या  ऍग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनाच उद्घाटन आज पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या पश्चिम  नागपूरातील दाभा मैदानावर  झाल, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी उद्घाटक म्हणून मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान  प्रामुख्यान उपस्थित  होते.  25 ते 28 नोव्हेंबर दरम्यान आयोजित चार दिवसीय ऍग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनात ऊस शेती, विदर्भात मत्स्य व्यवसायाचा विकास, बांबू उत्पादनातून संधी, विदर्भाचा दुग्ध विकास या मुख्य परिषदांसह विविध विषयांवर विस्तृत कार्यशाळा होणार आहेत. या प्रसंगी आयोजित कृषीप्रदर्शनात विविध कृषी निविष्ठाची  दालन, कृषी अवजार, पतपुरवठा संस्था, बँक, कृषी संशोधन संस्था यांची दालन आहेत यंदाच्या अग्रोव्हिजनची  संकल्पना 'अन्न, चारा आणि इंधन' - भविष्यातील

शेतीअशी आहे. या कृषी प्रदर्शनात सुमारे 450 दालन असून बायो सीएनजी वर चालणारा ट्रक्टर देखील येथे आहे. मोठ्या प्रमाणात शेतकरी, कृषी विभागाचे अधिकारी, नागरिक या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

दिव्यांग सक्षमीकरण पुरस्कार

केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीनं देण्यात येणाऱ्या दिव्यांग सक्षमीकरणात महाराष्ट्राला सात पुरस्कार जाहीर झाले आहेत. 'सुगम्य भारत अभियान' ची अंमलबजावणी करणार सर्वश्रेष्ठ राज्य म्हणून यंदाच्या वर्षासाठी हा पुरस्कार पुण्याच्या दिव्यांग कल्याण आयुक्तालयाला जाहीर झाला आहे.सर्वश्रेष्ठ दिव्यांग व्यक्ति पुरस्कार अशोक तुकाराम भोईर, विमल गव्हाणे, डॉ. शुभम रामनारायण धूत, जयसिंग चव्हाण याना जाहीर झाला असून,अकोला जिल्हा परिषद आणि औरंगाबादच्या महात्मा गांधी सेवा संघ या संस्थाचाही या राष्ट्रीय पुरस्कारात समावेश आहे. अकोला जिल्हा परिषदेन आरोग्य आणि समाज कल्याण विभागाच्या मदतीन जिल्हयातील दिव्यांग व्यक्तींच सर्वेक्षण यशस्वीपणे पूर्ण केल. या सर्वेक्षणामुळे दिव्यांगांसाठी असलेल्या केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण जिल्हयातील दिव्यांग व्यक्तींना सुकर झाले आहे.या उल्लेखनीय कार्यामुळे अकोला जिल्हा परिषदेला२०२१ चा राष्ट्रीय दिव्यांग जन पुरस्कार जाहीर झाला आहे.  जागतिक दिव्यांग दिनानिमित्त येत्या ३ डिसेंबर रोजी राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्लीत या पुरस्कारांच वितरण होणार आहे.

प्रदर्शन

दुर्मिळ छायाचित्रांद्वारे संविधानाच्या निर्मितीचा इतिहास व माहितीचे महत्व सांगणारे "भारताचे संविधान"मल्टीमिडीया छायाचित्र प्रदर्शन लावण्यात आले असून वर्धा जिल्हयातील नागरीक व विद्याथ्यांसाठी प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी आज केले. संविधान दिनानिमित्त केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय, वर्धा आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनच्या

सहाय्यक आयुक्त वर्धा यांच्या संयुक्त विद्‌यमाने सेवाग्राम मार्गावरील लक्ष्मीनगरातील सामाजिक न्याय भवनाच्या परिसरात भारताचे संविधान या विषयावर आयोजित केलेल्या मल्टीमिडीया छायाचित्र प्रदर्शनाचे फित कापून जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. त्यावेळी सामाजिक न्याय भवन सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. हे प्रदर्शन 28 नोव्हेंबर पर्यंत चालणार आहे.

स्मार्ट' प्रकल्प

महाराष्ट्र राज्य कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प हा राज्यातील कृषी क्षेत्रासाठी चित्र पालटवणारा असेल असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. जागतिक बँकेचे भारतातील संचालक ऑगस्टे तानो कौमे यांच्या अध्यक्षतेखालील शिष्टमंडळानं उपमुख्यमंत्र्यांची काल मुंबई येथील राजभवन इथं भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. राज्यातलं कृषिक्षेत्र, वातावरणीय बदलांना अनुकूल करण्याचे प्रयत्न होत आहेत, या प्रकल्पादरम्यान विकसित होणाऱ्या कालव्यांमुळे शेती आणि शेतकरी अधिक समृद्‌ध होणार आहे असं ते म्हणाले. यावेळी शिष्टमंडळातले मान्यवर आणि वरिष्ठ सनदी अधिकारी उपस्थित होते. पोक्रा-२ ह्या जवळपास ६०० दशलक्ष डॉलर्सच्या गुंतवणूक प्रकल्पाची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीनं यावेळी सकारात्मक चर्चा करण्यात आली.

इफ्फी

गोव्यात सुरु असलेल्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात इफ्फीमधे,भविष्यातल्या ७५ सृजनात्मक प्रतिभा या , सत्राच्या दुसऱ्या भागाची, ५३ तासांच्या आव्हानातील विजेत्यांना पुरस्कार देऊन सांगता झाली. या स्पर्धेत देशभरातील ७५ प्रतिभावंत दिग्दर्शकांची निवड करुन त्यांना इंडीया अट हंड्रेड या विषयावर ५३ तासात लघुपट बनवण्याचं आव्हान दिलं होतं. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी २१ नोव्हेंबर रोजी याची घोषणा केली होती.

**साहित्य संमेलन**

**अभिव्यक्ती वैधर्भीय लेखिका संस्था नागपूर आयोजित ऐसी अक्षरे रसिके या पाचव्या सर्व समावेशक साहित्य संमेलनाच आयोजन** 26 **ते** 27 **नोव्हेंबर दरम्यान आयटी पार्क नागपूर येथील कवी कुलगुरू कालिदास सभागृहात करण्यात आल आहे .उद्या या संमेलनाच उद्घाटन प्रख्यात साहित्यिका डॉ. प्रभा गणोरकर यांच्या हस्ते होणार असून कांचन गडकरी स्वागताध्यक्ष असतील.**

**अधिवास प्रमाणपत्र**

**महानिर्मिती कंपनीनं "सहाय्यक अभियंता" आणि "कनिष्ठ अभियंता" पदांची रिक्त पदं सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्याकरता जाहिरात प्रसिद्ध केली आहे. यासाठी अर्ज करणाऱ्या सर्व उमेदवारांना, महाराष्ट्र राज्याचं अधिवास प्रमाणपत्र बंधनकारक असल्याची अधिसूचना महानिर्मितीनं २१ नोव्हेंबर रोजी काढली आहे. त्याची प्रत महानिर्मितीच्या** www.mahagenco.in **या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या पदांकरता अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १७ डिसेंबर २०२२ आहे.**

******